पुणे शहर पोलीस

# दर्पण

सप्टेंबर २०१९

# अभिप्राय...

'दर्पण' पुस्तकाबाबत..

मी पोना ६८३२ कुमार, नेमणूक वानवडी पो.स्टे.

सध्या मी वानवडी पो.स्टे. येथे डी.बी./ठाणे अंमलदार म्हणून कर्तव्य करित आहे. पुण्याचे पोलीस आयुक्त श्री. डॉ. के. व्यंकटेशम सर यांनी पोलीस दलाची जनमानसात प्रतिमा उंचावण्यासाठी 'दर्पण' पुस्तकाची संकल्पना सुरु केली आहे. या दर्पण पुस्तकामध्ये पोलीस अधिकारी / व कर्मचारी यांनी केलेल्या चांगल्या कामाचा गौरव फोटो सहित छापला गेला त्यामुळे समाजातील लोकांना पोलीस सुध्दा चांगले काम करतो आहे याची जाणीव होऊ लागली आहे. त्यामुळे पोलीसांची प्रतिमा चांगली होण्यास मदत झाली आहे. दर्पण पुस्तकामध्ये पोलीसांचे कामाचा चांगल्या कामाचा गौरव केला जातो हे पाहून इतर पोलीस बांधव हे सुध्दा चांगले काम करण्याची इच्छा बाळगून चांगले काम करणे बाबत आग्रही प्रयत्न करतात.

'दर्पण' पुस्तक खरोखरच पोलीस अधिकारी व कर्मचारी यांच्या गौरवाचे पुस्तक आहे असे माझे वाटते.

पोना ६८३२ कुमार [illegible]
वानवडी पो.स्टे. पुणे

**गुडवर्क व दर्पण या पुस्तका बाबत अभिप्राय**

पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी केलेल्या चांगल्या कामास (Good Work) वर्तमान पत्रात प्रसिध्दी देण्याचा व वर्तमान पत्रात प्रसिध्द झालेल्या कात्रणांपासून तयार केलेले दर्पण हे पुस्तक नागरिकांना पाहणेसाठी पोलीस स्टेशन स्तरावर उपलब्ध करून देण्यात आलेले आहे. हा उपक्रम हा अत्यंत चांगला आहे.

या उपक्रमामुळे पोलीस अधिकारी व कर्मचारी हे दैनंदिन कर्तव्या दरम्यान स्वयंस्फुर्तीने चांगले काम करण्यासाठी प्रयत्न करीत असल्याचे दिसून येत आहे. तसेच अशा केलेल्या चांगल्या कामाची माहिती ही पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचे व्हॉटस्ॲप ग्रुप्सवर प्रसिध्द होत असल्याने त्याबाबत इतर अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून शुभेच्छा देण्यात येतात त्यामुळे चांगले काम केलेल्या कर्मचाऱ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण होतो तसेच इतरांना चांगले काम करण्याची व त्यास प्रसिध्दी देण्याची ईर्शा निर्माण होते.

तसेच दर्पण हे पुस्तक येरवडा पोलीस स्टेशन येथे येणारे नागरिक वाचतात व पोलीसांचे चांगले कामाबद्दल चर्चा करतात. तसेच पोलीसांचे कामाबद्दल लोकांमध्ये विश्वास निर्माण होत आहे. वर्तमान पत्रातील चांगल्या कामाचे प्रसिध्दी मुळे नागरिक समक्ष भेटून अभिनंदन व शुभेच्छा देतात. त्यामुळे एकप्रकारे चांगला अनुभव मिळतो व त्यातून अधिक चांगले काम करण्यासाठी प्रेरणा मिळत आहे. सदरचे उपक्रम हे अत्यंत चांगले असून ते यापुढेही कायमस्वरूपी चालू ठेवावेत.

( शुभांगी मगदुम )
महिला पोलीस उप निरीक्षक
येरवडा पोलीस स्टेशन, पुणे

# समुपदेशन व
# सामाजिक बांधिलकी

समुपदेशन व
सा. बांधिलकी

महाराष्ट्र टाइम्स – दि. ४ सप्टेंबर, २०१९

# रिक्षाचालकाच्या प्रामाणिकपणाचे कौतुक

येरवडा : तेवीस हजार रुपये रोख असलेली प्रवाशाची बॅग पोलिसांच्या हवाली करणाऱ्या रिक्षाचालकाचा चंदननगर पोलिस ठाण्याच्या कर्मचाऱ्यांनी सत्कार केला आहे. पोलिसांनी तत्परता दाखवून ती बॅग तत्काळ संबंधित प्रवाशाच्या ताब्यात दिल्याने त्यानेही रिक्षाचालकाचे आभार मानले. गुरुनाथ पोखरकर असे रिक्षाचालकाचे नाव आहे.


चंदननगर येथील ज्येष्ठ नागरिक रामचंद्र बळवंत कोरडे शनिवारी रुबी हॉल रुग्णालयात उपचार घेऊन पोखरकर यांच्या रिक्षात बसून घरी निघाले. चंदननगरच्या थांब्यावर उतरताना कोरडे रिक्षेतील बॅग घेण्याचे विसरले. थोड्या वेळाने पोखरकर यांना एक बॅग रिक्षेत राहिल्याचे लक्षात आले. त्यांनी रिक्षा चंदननगर पोलिस ठाण्यात नेली आणि बॅग पोलिसांच्या स्वाधीन केली.

पोलिसांनी बॅगेची पाहणी केल्यावर त्यात तेवीस हजार रुपयांची रोकड, मोबाइल आढळला. प्रवासी चंदननगरमध्ये उतरले असल्याने याच भागात राहत असल्याची शक्यता गृहीत धरून पोलिसांनी चौकशी सुरू केली. दरम्यान, कोरडे यांच्याशी संपर्क झाल्यावर त्यांना पोलिस ठाण्यात बोलावून बॅगेतील सामानाची सत्यता पडताळून पोलिसांनी बॅग त्यांच्या स्वाधीन केली. 'आम्ही प्रामाणिक रिक्षाचालक म्हणून पोखरकर यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला,' असे वरिष्ठ पोलिस निरीक्षक कृष्णा इंदलकर यांनी सांगितले.



पैशांची बॅग रिक्षाचालकाच्या मदतीने प्रवाशाच्या ताब्यात देताना चंदननगर पोलिस.

लोकमत – दि. २५ सप्टेंबर, २०१९



माणूस पुरस्कार रतनलाल सोनग्रा यांना प्रदान करताना सुनील फुलारी.

# पोलिसांमध्येही 'माणूस' दडलेला

## सुनील फुलारी : प्रा. रतनलाल सोनग्रा यांचा सन्मान

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** सर्वसामान्यपणे खाकी वर्दीचा सर्वांनाच धाक असतो. आमच्या कामाच्या स्वरूपामुळे देखील आमची मानसिकता आणि वर्तन समोरच्याला सामान्य वाटत नाही. परंतु, आमच्यातही शेवटी एक माणूसच दडलेला असतो, हे शाहू मोडकांसारख्या कलाकारांनी ओळखले आणि पोलिसी भूमिकांमधून त्यांनी योग्य न्याय दिला, असे मत पुणे शहराचे डेप्युटी इन्स्पेक्टर जनरल ऑफ पोलीस आणि ॲडिशनल कमिशनर ऑफ पोलीस सुनील फुलारी यांनी व्यक्त केले.

रंगत-संगत प्रतिष्ठान आणि श्यामची आई फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने दिला जाणारा 'माणूस पुरस्कार' ज्येष्ठ साहित्यिक आचार्य रतनलाल सोनग्रा यांना फुलारी यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी रंगत-संगत प्रतिष्ठानचे अध्यक्ष ॲड. प्रमोद आडकर, श्यामची आई फाउंडेशनचे अध्यक्ष भारत देसडला, प्रतिभा शाहू मोडक, सहायक पोलीस आयुक्त धनंजय धोपावकर उपस्थित होते.

- सुनील फुलारी म्हणाले, 'पोलीस प्रशासनातील नोकरीमुळे आमचा नेहमीच गुन्हेगार, चोरांशीच संबंध येतो. याचा मानसिकतेवर देखील परिणाम होतो. साहित्यिक कार्यक्रमांमधून आम्हाला सकारात्मक ऊर्जा मिळते. आयुष्याचे अनेक कंगोरे समजून घेण्याची दृष्टी मिळते.'
- प्रा. सोनग्रा म्हणाले, 'शाहू मोडकांच्या स्वभावात बुद्धाची करुणा होती. त्यामुळेच त्यांच्या हास्यात ती करुणेची झलक आपणास अनुभवायला मिळायची. शाहू मोडक म्हणजे संत साहित्य पचवलेला आणि विवेकानंदांची प्रेरणा मानणारा उच्चकोटीतला कलाकार होता."

महाराष्ट्र टाइम्स – दि. १८ सप्टेंबर, २०१९

# आत्महत्या करणाऱ्यास पोलिसांनी वाचविले

## पती-पत्नीतील वादही सामोपचाराने मिटवला

म. टा. प्रतिनिधी, पुणे

येरवडा येथे पती-पत्नीच्या वादातून एकाने नदीत उडी मारून आत्महत्येचा प्रयत्न केला; पण वेळेत आलेल्या येरवडा पोलिसांनी तातडीने नदीत उतरून नागरिकांच्या मदतीने त्याला बाहेर काढल्यामुळे त्याचा जीव वाचला. पोटच्या मुलीसह तो उडी मारणार होता; पण सुदैवाने त्याचा विचार बदलल्याने मोठा अनर्थ टळला. तसेच, पोलिसांनी मध्यस्थी करून पती-पत्नींमधील वादही मिटवला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बंडगार्डन बंधारा परिसरात एकजण चिमुकलीला घेऊन नदीपात्रात उडी मारण्यास जात असल्याचे तेथे उपस्थित असलेल्या नागरिकांनी पाहिले. त्यांनी तत्काळ पर्णकुटी पोलिस चौकीला ही माहिती कळवली. या वेळी चौकीचे अंमलदार सुनील जाधव यांनी तत्काळ बीट मार्शलचे सचिन जाधव व उमेश चिकणे यांना बोलवून घेऊन बंधाऱ्यावर धाव घेतली.

तसेच, काही नागरिकांना देखील पोलिसांनी सोबत घेतले. या वेळी नागरिकाने पाण्यात उडी मारल्याचे दिसले. पोलिसांनी त्याला नागरिकांनी मदतीने बाहेर काढले. त्याच्याकडे चिमुकलीबाबत चौकशी केली असता त्याने आपण मुलीला कठड्यावर ठेवल्याचे सांगितले.

'घरगुती कारणावरून पत्नीसोबत वाद झाले होते. त्यामुळे मी मुलीला घेऊन आत्महत्या करण्यास आलो होतो. पण, येथे आल्यानंतर माझा विचार बदलला आणि मुलीला कठड्यावर ठेवून उडी मारली,' असे आत्महत्या केलेल्या तरुणाने सांगितले. यानंतर पोलिसांनी त्याच्या पत्नीला बोलावून घेतले आणि दोघांमध्ये समोपदेश करून त्यांच्यातील वाद मिटविला.

क्राइ

महाराष्ट्र टाइम्स – दि. २१ सप्टेंबर, २०१९

# वेश्या व्यवसायातून तरुणींची सुटका

पुणे : कोरेगाव पार्क येथे 'स्पा'च्या नावाखाली सुरू असलेल्या वेश्या व्यवसायाच्या ठिकाणी पोलिसांनी छापा टाकून पाच परदेशी तरुणींची सुटका केली. या प्रकरणी 'जिवांका स्पा'चा मालक गोपाल रमेश मिश्रा (वय २३ रा. रामनगर, येरवडा) याला अटक करण्यात आली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अशोका मॉलमधील 'जिवांका स्पा'मध्ये मसाजच्या नावाखाली वेश्या व्यवसाय करून घेतला जात असल्याची माहिती सामाजिक सुरक्षा विभागाला मिळाली होती. त्यानंतर पोलिसांनी या 'स्पा'वर बनावट ग्राहक पाठवून खात्री केली. त्यानंतर छापा घालण्यात आला. 'स्पा'च्या मालकाला ताब्यात घेऊन कोरेगाव पार्क पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. दरम्यान, सहकारनगर येथे वेश्या व्यवसाय प्रकरणी एका महिलेला ताब्यात घेण्यात आले, तर एका तरुणीची सुटका केली.

प्रभात – दि. १४ सप्टेंबर, २०१९




# पोलिसांकडून जनजागृती

पुणे, दि. १३ - विसर्जन मिरवणुकीद्वारे हजारो नागरिकांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न पुणे पोलिसांनी पथनाट्याद्वारे केला. विसर्जन मिरवणुकीत मंडळांकडून पथनाट्य व चित्ररथातून विविध प्रकारचे समाजिक संदेश देण्याचे काम केले जाते. पुणे पोलिसांनीही संदेश देण्यासाठी हेच माध्यम वापरले. पुणे पोलिसांच्या वतीने 'भरोसा सेल व सायबर जनजागृती' या विषयावर पथनाट्याचे आयोजन केले होते. पोलीस आयुक्त डॉ. के. व्यंकटेशम् यांच्या संकल्पनेतून 'पंख' फाउंडेशनच्या वतीने या पथनाट्याचे सादरीकरण करण्यात आले.

यापूर्वी शहरातील ३० वस्त्यांसह २० गणेश मंडळांसमोर या पथनाट्याचे सादरीकरण करण्यात आले आहे. अखिल मंडई परिसरापासून मुख्य विसर्जन मिरवणुकीच्या मार्गावर कलाकारांनी सादरीकरण केले.

पुढारी – दि. ३० सप्टेंबर, २०१९



लोकसेवकांच्या सत्कारप्रसंगी डॉ. के. व्यंकटेश यांच्या समवेत मान्यवर.

# पूरग्रस्तांना मदत करणाऱ्या लोकसेवकांचा सत्कार

**बिबवेवाडी : वार्ताहर**

सारसबाग स्थित महालक्ष्मी मंदिर सार्वजनिक विश्वस्त संस्थेच्या वतीने रात्रंदिवस जिवाची पर्वा न करता पूरग्रस्तांसाठी आपले कर्तव्य बजावणाऱ्या लोकसेवकांचा पोलिस आयुक्त डॉ. के. व्यंकटेश यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

२५ सप्टेंबर रोजी रात्री पुणे शहरात पडलेल्या भयावह पावसात अनेक ठिकाणी पूर परिस्थिती निर्माण झाली होती त्यामध्ये स्वत:च्या जिवाची बाजी लावून नागरिकांना वाचविणारे पोलिस आणि अग्निशमन दलाच्या अधिकाऱ्यांचा सत्कार पुणे शहर पोलिस आयुक्त डॉक्टर के. व्यंकटेशम यांच्या हस्ते करण्यात आला.

या वेळी अग्निशमन दलाचे प्रमुख प्रशांत रणपिसे, दत्तवाडी पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक देवीदास घेवारे, स्वारगेट पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक ब्रह्मानंद नायकवडी संस्थेचे विश्वस्त प्रताप परदेशी, डॉ. मिलिंद भोई आदी उपस्थित होते.

पुण्यनगरी – दि. १२ सप्टेंबर, २०१९

# रात्रगस्तीवरील पोलिसांमुळे अल्पवयीन मुलगी आत्महत्येपासून परावृत्त

## वडिलांसोबतच्या भांडणानंतर करणार होती आत्महत्या : मनपरिवर्तनानंतर कुटुंबीयांच्या दिले ताब्यात

**। पुणे : पहाटेच्या सुमारास रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या एका रिक्षामध्ये एक अल्पवयीन मुलगी बसलेली रात्रगस्तीवरील पोलिसांना दिसली. तिच्याकडे चौकशी केली असता तिचे वडिलांशी भांडण झाले होते. तसेच, ती आत्महत्या करण्यासाठी घराबाहेर पडल्याची माहिती उघडकीस आली. पोलिसांनी तिचे मनपरिवर्तन करून तिला तिच्या कुटुंबियांच्या सुखरूप ताब्यात दिले.**



दत्तवाडी पोलीस ठाणे अंकित पर्वती पोलीस चौकीतील बिट मार्शल इरफान तडवी आणि गणेश कांबळे हे दोघे बुधवारी (दि.११) रात्री हद्दीतील रस्त्यावर गस्त घालीत होते. दरम्यान, पहाटे अडीच वाजण्याच्या सुमारास मित्रमंडळ चौकात रस्त्याच्या कडेला एक रिक्षा थांबलेली आढळून आली. त्यांना संशय आल्याने त्यांनी

१४ वर्षांची मुलगी बसलेली दिसून आली. पोलिसांनी तिच्याकडे चौकशी केली असता ती कात्रज कोंढवा रोड गोकुळनगरमध्ये राहत असल्याचे सांगितले. त्या मुलीकडे सखोल चौकशी केली असता ती मुलगी आत्महत्या करण्यास निघाली असल्याचे समजले.

तिला घरी जाण्यास सांगितले.

करायची आहे, असे सांगत होती. दरम्यान, पोलीस कर्मचाऱ्यांनी तिचे मार्गदर्शन करून मनपरिवर्तन केले. तसेच, तिचे आई-वडिलांशी संपर्क साधून मुलीस सुखरूप ताब्यात दिले. पालकांनी पोलिसांचे आभार मानले. वडिलांशी भांडण करून ती मंगळवारी सायंकाळी घरातून

काहीएक मौल्यवान वस्तू तसेच मोबाइल नव्हता. रात्री उशिरापर्यंत मुलगी घरी परतली नसल्याने त्यांनी तिचा शोध घेतला.

दरम्यान, गस्ती पथकातील पोलिसांनी तिला पाहून तिच्याकडे चौकशी केली नसती तर तिने आत्महत्या करण्याचे टोकाचे पाऊल

### संगम पुलावरून उडी मारलेल्या महिलेस जीवदान

संगमवाडी भागात बुधवारी सायंकाळी प्रादेशिक परिवहन कार्यालयाजवळील संगम पुलावरून एका तीस वर्षीय महिलेने पाण्यात उडी मारली. दरम्यान, याबाबत वर्दी मिळताच अग्निशमन दल आणि जीवरक्षक यांनी महिलेस सुखरूप पाण्याबाहेर काढले. शहरात मागील दोन दिवसांत अशाप्रकारे आत्महत्येसाठी उडी मारल्याचा दुसरा प्रकार आहे. अग्निशमन दलाचे जवान चंद्रकांत सोनावळे व जीवरक्षक जगन तिकोणे, बापू तिकोणे, चेकन परदेशी आणि काळूराम टेमगिरे यांनी ही कामगिरी केली.

पुढारी – दि. १९ सप्टेंबर, २०१९

# रिक्षात विसरलेली बॅग केली परत

**बिबवेवाडी : वार्ताहर**

रिक्षाचालकाने रिक्षात विसरलेली प्रवाशाची बॅग बिबवेवाडी पोलिस स्टेशनमध्ये आणून देत बॅग मूळ मालकाला परत केल्याचा प्रकार पुण्यात घडला. बिबवेवाडी पोलिसांनी रिक्षाचालक वाहिद सुतार यांच्या प्रामाणिकपणाचा सत्कार केला.

सोमवारी डॉ. अमित कांबळे (रा. तोडकर रेसिडेन्सी, बिबवेवाडी, पुणे) हे बिबवेवाडी ते शिवाजीनगर असा रिक्षाने प्रवास करीत असताना. त्यांचा पासपोर्ट व इतर महत्त्वाची कागदपत्रे असलेली बॅग प्रवासादरम्यान रिक्षात विसरली. या घटनेची माहिती प्रवाशींच्या पत्नीने बिबवेवाडी पोलिस ठाण्यात दिली. या वेळी रिक्षाचालक वाहिद अनिस सुतार (रा. सिध्दी



रिक्षाचालकाचा गौरव करताना बिबवेवाडी पोलिस व इतर.

विनायक कॉलनी, शास्त्रीनगर, कोथरूड, पुणे) यांनी रिक्षात विसरलेली बॅग बिबवेवाडी पोलिसांना आणून दिली. बिबवेवाडी पोलिसांनी डॉ. अमित कांबळे व धनश्री कांबळे यांची रिक्षात विसरलेली बॅगेची ओळख पटवून रिक्षाचालकाच्या समक्ष परत केली. बॅग सुरक्षितपणे मिळाल्याबाबत कांबळे दाम्पत्यानी रिक्षाचालकाचे आभार मानले. या वेळी रिक्षाचालकाच्या प्रामाणिकपणाबद्दल बिबवेवाडी पोलिसांनी सत्कार केला.

लोकसत्ता – दि. १५ सप्टेंबर, २०१९

# दामिनी पथकाचा गौरव

**लोकमत न्यूज नेटवर्क**

**पुणे :** छावा स्वराज्य सेनेच्यावतीने पुणे पोलीस आयुक्तालयांतर्गत महिलांच्या रक्षणासाठी, तसेच सेवेसाठी स्थापन केलेल्या महिला दामिनी पथकातील महिलांच्या उत्तम कामगिरीची दखल घेऊन छावा स्वराज्य सेनेच्यावतीने त्यांना सन्मान पत्र व स्मृतिचिन्ह देऊन गौरवले.

पोलीस आयुक्तालयातील कार्यक्रमात पो. नि. विजया कारंडे, स. पो. नि. स्वाती केदारी, पो. उपनिरीक्षक प्रिया टिळेकर व ३७ रणरागिणींचे दामिनी पथक उपस्थित होते. गुन्ह्यांच्या घटना रोखण्यासाठी तयार केलेल्या विशेष प्रशिक्षित महिला पोलिसांचे दामिनी पथक वाढत्या गुन्ह्यांना आळा घालण्यात यशस्वी झाल्याचे पोलीस निरीक्षक विजया कारंडे यांनी सांगितले. छावा स्वराज्य सेनेचे संस्थापक अध्यक्ष राम घायतिडक (पाटील), प्रदेशाध्यक्ष राजेंद्र पडवळ, प्रदेश कार्याध्यक्ष आरिफ शेख, पुणे शहराध्यक्षा मेघा कदम आणि पिंपरी-चिंचवड शहराध्यक्ष सौरभ सगर, तसेच सेनेचे सर्व प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. सेनेचे सांस्कृतिकचे प्रदेशाध्यक्ष जितेंद्र वाईकर यांनी सूत्रसंचालन केले.

Sakal Times - 24 September, 2019

# 412 senior citizens' abuse cases resolved by cops

## 460 cases have been registered at the 'Bharosa Cell' in the last nine months

**ST CORRESPONDENT**
reporters@sakaaltimes.com

**PUNE:** Most senior citizens in Pune face humiliation and harassment from their own family members, relatives, children and in-laws, states an analysis of the complaints received by the Bharosa Cell of Pune city police Crime Branch.

'Bharosa Cell', the first-of-its-kind initiative by city police to provide assistance to senior citizens, women and children, had received 460 complaints from senior citizens in the last nine months. According to police officials, the cell with a separate section for senior citizens, received cases of humiliation by children, when they don't talk to them or leave them alone.




**FOR THE BETTERMENT OF SOCIETY:** 'Bharosa Cell', the brainchild of Police Commissioner Dr K Venkatesham, is functioning under the Crime Branch at the Commissioner's Office near GPO in Camp.

Senior citizens have also been harassed in property-related matters. So far, the cell has resolved 412 out of a total of 460 complaints of senior citizens.

On Saturday, a meeting of senior citizens from different areas in the city was organised at the Police Commissioner's Office in Camp. Besides police officers, officials from different departments of the Pune Municipal Corporation (PMC), Social Welfare Department and NGOs were present at the meeting. They held a discussion with the elderly persons.

लोकमत – दि. ४ सप्टेंबर, २०१९

# वक्तृत्वाने व्यक्तिमत्त्व होते समृद्ध

## किरण बालवडकर : 'ती'च्या गणेशोत्सवातील आंतरशालेय वक्तृत्व स्पर्धा

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** स्त्रीशिवाय पुरुषाच्या जीवनाला आकार येत नाही. ज्याप्रमाणे आईने दिलेल्या संस्कारामुळे आपण घडत असतो. त्याचप्रमाणे आपल्या उपजत गुणांमुळे आपला विकास होत असतो. वक्तृत्वामुळे व्यक्तिमत्त्व समृद्ध होते, असे मते डेक्कन वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक किरण बालवडकर यांनी व्यक्त केले.

लोकमत 'ती'चा गणपती गणेशोत्सवात आंतरशालेय वक्तृत्व स्पर्धेच्या अंतिम फेरीतील बक्षीस वितरण सोहळ्यात ते बोलत होते. या वेळी परीक्षक म्हणून अजिंक्य देशमुख, ॲड. प्रार्थना सदावर्ते, संकेत कल्याणकर उपस्थित होते. घोले रस्त्यावरील पं. जवाहरलाल नेहरु सभागृहात अंतिम फेरी पार पडली. इयत्ता ५ वी ते ७ वी (लहान गट) आणि ८ वी ते १० वी (मोठा गट) अशा दोन गटांमध्ये स्पर्धा घेण्यात आली.



लोकमत 'ती'च्या गणेशोत्सवानिमित्त घेतलेल्या वक्तृत्व स्पर्धेतील विजेते मान्यवरांसोबत.

लहान गटातून प्रथम क्रमांक अहिल्यादेवी हायस्कूल फॉर गर्ल्सची नभा विनायक मणेरीकर, द्वितीय क्रमांक नूमवि मुलांची शाळा, आर्यन काशीद, तृतीय क्रमांक सिटी प्राईड स्कूल, वेदिका संदीप जाधव तर उत्तेजनार्थ सारथी प्राथमिक विद्यालय, दीपिका दत्ता साखरे, एस.एन.बी.पी. स्कूलचा धवल शहा यांनी मिळविले. मोठ्या गटातून प्रथम क्रमांक भारतीय जैन संघटना, वैष्णवी सूर्यवंशी, द्वितीय क्रमांक गेनबा सोपानराव मोझे प्रशाला, वेदांत भोसले, तृतीय क्रमांक हिंदुस्थान अँटिबायोटिक्स स्कूल, निकिता बिराजदार, तर उत्तेजनार्थ सिटी प्राईड स्कूल, प्रांजली धायगुडे, मॉर्डन हायस्कूल, जयेश सूर्यवंशी यांनी मिळविले. स्पर्धेसाठी 'ती'चा गणपती वितरणप्रसंगी मॉर्डन हायस्कूल मुलींची पुणे, मॉर्डन हायस्कूल मुलांची पुणे बक्षीस वितरण कार्यक्रमास उपस्थित होते. वितरणप्रसंगी पोलीस निरीक्षक किरण बालवडकर आणि परीक्षक ॲड. प्रार्थना सदावर्ते यांच्या हस्ते करण्यात आले.

महाराष्ट्र टाइम्स – दि. ५ सप्टेंबर, २०१९

# समाजव्यवस्थेचे भान हवे

## अतिरिक्त पोलिस आयुक्त मोराळे यांचे मंडळांना आवाहन

म. टा. प्रतिनिधी, पुणे

'पुण्यातील सार्वजनिक गणेशोत्सव हा आंतरराष्ट्रीय दर्जाचा असून, मंडळांनी समाजव्यवस्थेचे भान ठेवत आणि सामाजिक बांधिलकी जपत गणेशोत्सव आनंदाने आणि उत्साहाने पार पाडावा,' असे आवाहन शहर अतिरिक्त पोलिस आयुक्त अशोक मोराळे यांनी नुकतेच सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना केले.

संस्कृती प्रतिष्ठानतर्फे आयोजित संस्कृती विघ्नहर्ता पुरस्कार वितरण समारंभात ते बोलत होते. कोथरूड विधानसभा मतदारसंघात सार्वजनिक गणेशोत्सव आणि सोसायटी गणेशोत्सव, अशा दोन गटांत ही स्पर्धा घेण्यात आली होती. या वेळी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पुणे महानगर कार्यवाह महेश करपे, सहायक पोलिस आयुक्त मच्छिंद्र चव्हाण, अभिनेते ओम भुतकर, देवेंद्र गायकवाड, रमेश परदेशी, क्षितीश दाते, पोलिस उपायुक्त पौर्णिमा गायकवाड, पोलिस निरीक्षक प्रतिभा जोशी, कल्पना जाधव, ढोल-ताशा महासंघाचे पराग ठाकूर, नगरसेवक दीपक पोटे, मंजुश्री खर्डेकर, वासंती जाधव, हर्षाली माथवड, अल्पना वर्पे आदी उपस्थित होते.

'गणेशोत्सव मंडळे सामाजिक विकासासाठी योगदान देत असून, पोलिसही मंडळांशी संवाद साधत आहेत,' असे मोराळे म्हणाले. 'गणेशोत्सव मंडळांचे मनोबल वाढवण्याची गरज असून, कार्यकर्त्यांच्या मागे उभे राहण्याची प्रतिष्ठानची भूमिका कौतुकास्पद आहे,' असे करपे म्हणाले. 'शहरात कुठलाही अनुचित प्रकार घडू नये, याची काळजी म्हणून आम्ही ६००पेक्षा अधिक गणेश मंडळांना संस्कृती प्रतिष्ठानच्या माध्यमातून सीसीटीव्ही वितरित केले आहेत,' असे मोहोळ यांनी सांगितले.



संस्कृती प्रतिष्ठानतर्फे आयोजित संस्कृती विघ्नहर्ता पुरस्कार वितरण समारंभात मंडळांना गौरवण्यात आले.

# अभिप्राय...

प्रति,

मा. वरीष्ठ पोलीस निरीक्षक सो.
सिंहगडरोड पोलीस स्टेशन, पुणे शहर
यांना सविनय सादर,

प्रतिवेदक :- आर.के.गोसावी, पोलीस हवालदार ५३८८, सिंहगडरोड पोलीस स्टेशन, पुणे

विषय :- दर्पन पुस्तकासंदर्भात अभिप्रायबाबत.

उपरोक्त विषयान्वये सविनय सादर की, मा. पोलीस आयुक्त सो. पुणे शहर यांनी पोलीस आयुक्तालयातील अधिकारी व कर्मचारी यांनी केलेल्या चांगल्या कामगिरीची माहिती नागरिकांना समजावी या उद्देशाने पोलीस ठाणे येथे दैनंदिनी कामकाज करीत असताना झालेल्या चांगल्या कामगिरीबाबतची प्रेसनोट जनसंपर्क अधिकारी पोलीस आयुक्त कार्यालय पुणे शहर यांचे कार्यालयात सादर करणेबाबत दिलेल्या आदेशाप्रमाणे पोलीस ठाणे येथे आठवडाभरामध्ये झालेल्या चांगल्या कामगिरीची प्रेसनोट सादर करण्यात येत असुन सदरची प्रेस नोट वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द झाल्यानंतर सदरचे पेपर कात्रनाची कटिंग करुन त्या पासुन दर्पन हे पुस्तक तयार करण्यात आले आहे. सदरचे पुस्तक हे ठाणे अमंलदार कक्षामध्ये ठेवण्यात येत असुन पोलीस ठाणे येथे येणारे नागरिकांना सदरचे पुस्तक वाचण्यासाठी देण्यात येत असते.

दर्पन या पुस्तकामुळे पोलीस आयुक्तालयातील अधिकारी व कर्मचारी यांनी केलेल्या चांगल्या कामगिरीची माहिती एकत्रीतपणे वाचण्यासाठी उपलब्ध झालेली असुन दर्पन पुस्तक वाचल्यानंतर नागरिक हे पोलीसांचे चांगल्या कामाचे कौतुक करत आहे. नागरिकांच्या मनामध्ये पोलीसांविषयी चांगल्या प्रकारची भावना निर्माण होत आहे. तसेच पोलीस कर्मचारी व अधिकाऱ्यांचेही मनोबल वाढलेले असुन ते ही चांगली कामगिरी करुन आपले नाव व फोटो वर्तमान पत्रामध्ये येवुन त्याचे कात्रण दर्पण पुस्तकामध्ये समाविष्ट होणेसाठी चांगली कामगिरी करण्याचे प्रयत्न करीत आहेत.

मा. सादर व्हावे,
दि. १८/०६/२०१९

(आर.के.गोसावी)
पोलीस हवालदार ५३८८
सिंहगडरोड पोलीस ठाणे पुणे शहर.

---

प्रति,

मा. पोलीस आयुक्त सो,
पुणे शहर
यांना सविनय सादर

रिपोर्ट :- के एस पलांडे पोलीस शिपाई ८५६४ चंदननगर पोलीस स्टेशन पुणे शहर
यांजकडुन विनंती पुर्वक की,

विषय :- दर्पण पुस्तिकेच्या अभिप्रायाबाबत...

महोदय,

/- उपरोक्त विषयान्वये सविनय सादर की, मी चंदननगर पोलीस स्टेशन या ठिकाणी ०३ वर्षापासुन नियुक्तीस असुन सायबर विभागामध्ये काम करत आहे. मा.पोलीस आयुक्त सो यांनी दर्पण पुस्तीकेच्या माध्यमातुन पोलीसांनी केलेली कामे, गुन्हयाचा लावलेला शोध, जेष्ठ नागरिकांना केलेली मदत व गुन्हास प्रतिबंध होणेसाठी केलेल्या उपाययोजना तसेच सामान्य नागरीकांना येणा-या अडचणी कशा सोडवाव्या या सदंर्भात केलेले मार्गदर्शन केले आहे. तसेच पोलीसांनी केलेल्या कामचे प्रशिस्ती प्रत्रक दपर्ण या पुस्तीकेच्या माध्यमातुन समाजासमोर मांडले आहे. त्यामुळे पोलीस व सामान्या नागरीकामध्ये चांगले सबंध तयार होत आहेत. त्यामुळे दर्पण ही पुस्तीकेचे पोलीस स्टेशनला येणारे नागरीक खुप कौतुक करत आहेत.

दर्पण पुस्तीका पोलीसांनी केलेल्या कामाचा सन्मानाबाबत मा.पोलीस आयुक्त सो. यांचे खुप खुप अभिनंदन. माननियांना सादर

तरी सदर माहिती अवलोकन व आदेशार्थ सविनय सादर.

मा.सादर व्हावे
दि. १६/०५/२०१९

पोलीस शिपाई ८५६४
चंदननगर पोलीस स्टेशन पुणे शहर



चुकलेला मुलगा विसावला आईच्या कुशीत
At junctions of Smart City, an 'intelligent' syste
o help manage Pune's many traffic problems
आयुक्तांकडून कॉन्स्टेबलला
मिळाले 'सरप्राईज गिफ्ट'
नदीत पडलेल्या मुलाचे पोलिसांनी वाचविले प्राण
स्थानबद्धतेतून सराइतांवर पोलिसांच
व्हिडिओ कॉल सुरु ठेवून आत्महत्येचा प्रयत्न
वक्तृत्वाने व्यक्तिमत्त्व होते समृद्ध
चोरांची टोळी अटके
८२ मोबाइल जप्त
नदीत उडी मारलेल्या
तरुणाला वाचवले
तंबाखूजन्य पदार्थ
दागिनेचोर जेरबंद
ILLEGAL SAND TRANSPORTATION
Driver arrested for stealing trucks
attached by revenue dept officials
डॉक्टरच्या वेशातील वाहनचोरास अटक
गुन्हेगार जेरबं
वाघाच्या कातड्याची तस्करी
बेकायदा पिस्तूल
बाळगणारा अटकेत
दोन दिवसांत ३७५ कोयते जप्त
पिस्तुलाची हौस पडली महागात!